# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.12.2025** **वार- शुक्रवार**

---

**ऊस-गाळप**

राज्यातील ऊस गाळप हंगामानं जोर धरला असून आतापर्यंत सुमारे 270 लाख मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण झालं आहे. 8 पूर्णांक 5 शतांश टक्के निव्वळ साखर उताऱ्यानुसार 21 लाख 75 हजार टन साखर उत्पादन झालं आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उसाचं दुप्पट गाळप झाल्याचं पुण्यातील साखर आयुक्तालयाच्या अहवालात नमूद केलं आहे. साखर आयुक्त डॉक्टर संजय कोलते यांनी ऊस गाळप हंगामाच्या सुयोग्य नियोजनासाठी मार्गदर्शन केलं. परिणामी 102 खासगी आणि 101 सहकारी साखर कारखान्यांना ऑनलाईन ऊस गाळप परवाने वितरित करण्यात आले. विविध कारणांस्तव केवळ 10 कारखान्यांना गाळप परवाने देणं बाकी आहे असं साखर सहसंचालक महेश झेंडे यांनी सांगितलं.

**बालविकास**

पुणे जिल्हा परिषदेच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी आणि पर्यवेक्षिका यांची मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज आढावा बैठक घेण्यात आली. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेबाबत प्रशिक्षण दिल्याप्रमाणं ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबवावी. दिलेल्या प्रशिक्षणानुसार कुपोषणमुक्तीसाठी सर्वांनी संपूर्ण प्रयत्न करावेत अशा सूचना पाटील यांनी दिल्या. एकल महिलांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी अधिकाधिक शिबिरांचं आयोजन करावं. अंगणवाड्यांमध्ये सुधारणा करण्याबाबत, त्यांचा दर्जा वाढवण्याबाबत प्रयत्न करावेत असंही पाटील यांनी सांगितलं.

**लिफ्ट-अपघात**

काही दिवसांपूर्वी चिंचवडमध्ये एका 12 वर्षाच्या मुलाचा लिफ्टच्या अपघातात मृत्यू झाल्याच्या घटनेचा उल्लेख करत, हौसिंग सोसायटीतील इमारतींमधील लिफ्टचे अपघात टाळण्यासाठी नवीन कायद्याची तातडीनं अंमलबजावणी करावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली.

**पुणे-म्हाडा**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळानं विविध योजनांसाठी काढलेल्या सुमारे सव्वा चार हजार घरांची सोडत लांबणीवर पडली असून, ती आता 16 किंवा 17 डिसेंबरला घेण्याचा प्रयत्न आहे. या सोडतीसाठी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बोलावण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली. म्हाडानं पुणे, पिंपरीसह सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत 4 हजार 168 घरांची सोडत काढली असून या सोडतीसाठी 2 लाख 15 हजार अर्ज आले आहेत. पुढील आठवड्यातच जिल्हा परिषद आणि महापालिकांच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्यानं काही अडचण आल्यास, त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**आरटीओ-आवाहन**

राज्यातील वाहनधारक आणि चालकांची आर्थिक फसवणूक वाढल्याच्या पार्श्वभूमीवर बनावट वेबसाइट्स, ॲप्स आणि खोट्या ई-चलन लिंकपासून सावध राहण्याचं आवाहन पुणे परिवहन विभागानं नागरिकांना केलं आहे. फसवणूक करणारे

अनधिकृत पेमेंट लिंक पाठवून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत आहेत. आरटीओ कार्यालय किंवा परिवहन विभाग नागरिकांना कधीही व्हॉट्सॲपवरून पेमेंट लिंक पाठवत नाही असं परिवहन विभागानं स्पष्ट केलं आहे.

**स्वच्छ सर्वेक्षण**

स्वच्छ सर्वेक्षण 2025 अभियाना अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या "अ" क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक 10 अंतर्गत इंदिरानगर इथल्या आय.बी.एम.आर कॉलेजमध्ये आधुनिक कंपोस्ट ड्रमचं लोकार्पण काल करण्यात आलं. ओल्या कचऱ्यावर जागेवरच प्रक्रिया करून त्याचं उपयुक्त सेंद्रिय खतामध्ये रूपांतर कसं करता येतं, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आलं. सॉर्ट या उपक्रमांतर्गत शैक्षणिक संस्था आणि गृहनिर्माण सोसायट्यांना 6 एरोबिक कंपोस्टर्स विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात. यांच्या साहाय्यानं दररोज 75 किलोपर्यंत ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करता येते त्यामुळे कचरा उचलण्याचा तसंच वाहतुकीचा ताण कमी होत असून कार्बन उत्सर्जनातही घट होत आहे.

**विमा**

पुणे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवरील अधिकारी तसंच कर्मचारी यांच्यासाठी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना सन 2016 पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत कामगार कल्याण विभागामार्फत आजअखेर 23 सेवकांना किंवा त्यांच्या वारसांना दोन कोटी 24 लाखांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आली आहे.

**यशस्वी**

औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागानं कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी असं आवाहन एडवोकेट आदित्य जोशी यांनी आज केलं. यशस्वी स्किल्स लिमिटेडच्या पुढाकारानं गोखले इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित 'नवीन कामगार कायदे समजून घेताना' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

**कौशिक**

कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठानच्या वतीनं आयोजित केल्या जाणाऱ्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमालेत यंदा डॉक्टर संजय उपाध्ये आणि डॉक्टर उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानांचं आयोजन तेरा आणि चौदा डिसेंबरला, सायंकाळी सात वाजता, पुण्यातील स. प. महाविद्यालयात करण्यात आलं आहे. ही व्याख्यानमाला सर्वांसाठी विनाशुल्क आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या किमान तापमान 8 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**